29/07/2022

# हदगाव दरोड्यातील तिघांना एलसीबीकडून अटक

नांदेड, दि. २८ : हदगाव शहरातील प्रसिद्ध व्यापारी यादव गंधेवार यांच्या बसवेश्वर चौकातील घरावर धाडसी चोरी करून नगदी ५ लाखासह सोन्या चांदीचे दागिने असा एकूण ३२ लाखांचा ऐवज लुटून नेणाऱ्या तिघांना एलसीबीने अटक केली. गंधेवार यांच्या घरावर पडलेल्या दरोड्यानंतर नागरिकांत असुरक्षिततेचे वातावरण पसरले होते. दरम्यान या जबरी चोरीचा छडा लावण्यात एलसीबीला दहा दिवसातच यश आले.

दि. १६ जुलैच्या मध्यरात्री गंधेवार व त्यांचे नातू प्रमोद शेट्टी हे कुटुंबीयासमवेत घरात झोपलेले असताना चोरट्यांनी घरात प्रवेश केला. चोरट्यांनी सहा महिन्याच्या बालकाच्या गळ्याला शस्त्र लावून दरोडेखोरांनी तिजोरी व कपाटाच्या चाव्या घेतल्या. जवळपास ३२ लाखाचा ऐवज घेऊन चोरटे फरार झाले. या प्रकरणी प्रमोद शंकरराव शेट्टी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन हदगाव पोलीस स्थानकात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचा तपास हदगाव पोलीस स्टेशन तसेच स्थानिक गुन्हे शाखा समांतर करत होती.

सदरचा गुन्हा कुख्यात दरोडेखोर लक्ष्मण मेटकर व त्याच्या सांथीदारांनी केल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर एलसीबीच्या पथकाने लक्ष्मण पिराजी मेटकर (रा. नांदुसा) व दशरथ गंगाराम देवकर (रा. दगडवाडी) यांना पुणे येथून ताब्यात घेऊन चौकशी केली असता आणखी तीन साथीदार असल्याचे तपासात समोर आले. विशेष म्हणजे दरोड्याचा हा प्रकार टिप देऊन घडल्याचे आरोपींनी सांगितले. फरार असलेले तीन आरोपी आणि टिप देणारे दोघे जण यांचा एलसीबीने शोध घेतला असता गुन्हा करताना सोबत असलेल्या इतर तीन आरोपी पैकी राजू लच्छीराम देवकर (रा. बटाळा) हा चिकाळा तांडा येथून पोलिसांनी पकडले व जबरी चोरीच्या गुन्ह्यातील राजू देवेकर, दशरथ देवकर आणि लक्ष्मण मेटकर या तिघांना स्थागुशाने अटक केली.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक अशिष बोराटे हे करत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उप. पो. अधीक्षक निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. द्वारकादास चिखलीकर, सपोनि पांडूरंग मोने, सपोनि शिवासांब घेवारे, पोउपनि सचिन सोनवणे, आशिष बोराटे, दत्तात्रय काळे यांच्यासह पोलीस कर्मचारी जसवंतसिंघ शाहू, गुंडेराव वारले, मारोती तेलंगे, गंगाधर कदम, जिंकलवाड, देवा चव्हाण, रवी बाबर, आदींनी केली. या सर्वांचे वरिष्ठांकडून कौतुक करण्यात आले.

दै. लोकमत दि. 29/07/2022

# दोन गावठी पिस्टल, एक जिवंत काडतुस नाकाबंदीत केले जप्त

## पोलिसांचे ऑलआऊट ऑपरेशन: आरोपीस घेतले ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात पोलिसांनी २७ जुलै रोजी रात्री केलेल्या नाकाबंदीमध्ये आरोपीकडून दोन गावठी पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले आहे.

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या आदेशावरून २७ जुलै रोजी शहरात ऑलआऊट ऑपरेशन व नाकाबंदी करण्यात आली. येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने आरोपींचा तपास करण्यासाठी अण्णाभाऊ साठे चौकामध्ये सापळा लावला. यावेळी आरोपी तेजिंदरसिंघ मोहनसिंघ टप्पेवाले (२३, रा.सखोजी नगर, जि. नांदेड) यास या नाकाबंदीमध्ये ताब्यात घेतले. यावेळी आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे दोन गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस मिळून आले. पोलिसांनी हे शस्त्र जप्त केले आहेत. पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख व पोलीस निरीक्षक नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने ही कामगिरी केली.